# वसंतराव नाईक कृषिभूषण २००९

## श्री.रमेश जयराम शेरके

### मु.पो. आसोली, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग



- जमीनधारणा ३.०२ हे. असून पिकांना उत्तम प्रतीचे कंपोस्ट खत मिळणेसाठी गोबरगॅस संयंत्र बसविले.
- सुवासिक तेल निर्माण करणेसाठी वापरल्या जाणा-या सुरंगीच्या फुलाची आंबा व काजू पिकामध्ये आंतरपिक म्हणून लागवड
- श्रीदेवनारायण शेतकरी संघाची स्थापना करुन शेतकरी मेळावे, बचत गट, कृषि ग्रंथालय यासारखे उपक्रम सुरु
- बचतगटांना बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करुन देवून दुग्धव्यवसाय सुरु केल्याने बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करुन दिला.
- कोकम फळावर प्रक्रिया करुन कोकम सरबत व आमसुले तयार करुन त्याची स्थानिक बाजारात विक्री.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००९

## श्री. दशरथ गरबड पाटील

### मु.बामडोद, पो. खोंडामळी, ता. जि. नंदूरबार



- फळपिकांसाठी ठिबक सिंचनाचा व तृणधान्यासाठी तुषार सिंचनाचा वापर.
- आधुनिक तंत्रज्ञान वापरुन रोशनी वाणाची मिरची लागवड ३.०० एकर क्षेत्रात घेवून एकरी २५० क्वि. उत्पन्न.
- पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय व शेळी पालन
- तालुका पातळीवर पीक स्पर्धेत सहभाग – कापूस पिकाचे हेक्टरी ४० क्विं. उत्पन्न.
- शेतीबरोबरच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००९

## श्री. गणेश भालचंद्र कुलकर्णी

### मु.पो.उपळाई(खुर्द), ता.माढा, जि. सोलापूर



- एकूण क्षेत्र १२.४३ हे. असून पंचक्रोशीत १९९४ पासून प्रयोगशील व अर्थशास्त्रीय शेती सुरु .
- कुशल व्यवस्थापन व योग्य नियोजनाद्वारे बिगरमोसमी टरबुजाची १५ एकर क्षेत्रात लागवड करुन भरपूर उत्पादन.
- जमीनीत गावखताचा जास्तीत जास्त वापर करुन ठिबक व तुषार सिंचनाचा प्रकल्प उच्च तंत्रज्ञानाच्या सहाय्याने राबविणे.
- एकूण १५ संकरित जनावरे असून रोजचे १५० ते २०० लिटर दुधाचे संकलन.
- द्राक्ष शेतात उन्हाळयात प्लॅस्टीक मल्चींगचा वापर, योग्य नियोजन करुन युरोपात द्राक्ष निर्यात.
- दोन शेततळयाच्या मदतीने पाण्याचा साठा.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००९

## श्री. बाळासाहेब शामराव चव्हाण

## मु.पो. आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली



- संपूर्ण क्षेत्रावर पर्यावरणाचा समतोल साधून पडीक व बांधावरील जमिनीचा उपयोग वनीकरणासाठी केला.
- १.६० हे.क्षेत्रावर पॉलीहाऊसची उभारणी करुन गुलाब, जरबेरा, कार्नेशन या फुल पिकाचे उत्पादन घेणे.
- ३.०० एकर क्षेत्रावर मोगरा फुलपिक घेवुन त्याची शितपेटीतून वाहतूक करुन ती फुले मुंबईला दररोज पाठवितात.
- दोन विहीरीचे पुनर्भरण करुन घेवून सर्व क्षेत्रावर ठिबक सिंचनाचा वापर
- सन २००३-०४ मध्ये ए-वन हायटेक कृषि विज्ञान मंडळाची स्थापना केली ---- १००० शेतक-याना संघटीत करुन त्यांना मार्गदर्शन करणे.
- विज भारनियमावर मात करणेसाठी ट्रॅक्टरचलित जनित्राची सुविधा उपलब्ध केली.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००९

## श्री. सुदाम निवृत्तीराव साळुंके

### मु.पो. गोलटगाव, ता. जि. औरंगाबाद



- संयुक्त कुटुंबातील एकूण २७.१३ हे. जमिनीचे सपाटीकरण करुन सर्व क्षेत्रावर कंटूर बांधबदिस्ती.
- शेतीच्या बांधावर चिंच, बांबू व सागवान झाडांची लागवड .
- एकूण ४ हजार मोसंबी झाडे असून त्यापासून वर्षाला अंदाजे रु. ७.०० लाखापर्यत उत्पादन.
- एक हेक्टर क्षेत्रावर ९०० डाळिंब भगवा या जातीची लागवड.
- सन १९८४-८५ मध्ये विक्रमी दुध उत्पादनासाठी तालुकास्तरीय पुरस्कार प्राप्त.
- सन १९९० मध्ये वसंतराव नाईक प्रतिष्ठान पुरस्कार तसेच २००१-२००३ मध्ये मृद संधारण व पाणलोट क्षेत्र विकास पुरस्काराने सन्मानित .

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००९

## श्री. सुभाष बालाजीराव यशवंतकर

### मु.पो. गोकुळनगर, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड



- एकूण ६ हेक्टर शेती असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन आवळा, आंबा, व इतर फळपिके घेतली.
- जोडधंदा म्हणून गांडूळखत प्रकल्प, दुग्ध व्यवसाय व कुक्कुटपालन व्यवसाय सुरु केला तसेच साई पद्मजा या नावाने रोपवाटिका सुरु.
- हरितगृह व राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत पॅकहाऊसची उभारणी
- मागील २५ वर्षापासून पत्रकारिता करीत असून ब-याच वृत्तपत्रामधून कृषि विषयक माहितीचे वार्तांकन.
- सन २००५-०६ चे कृषिनिष्ठ पुरस्कार त भारतीय कृषक समाज नवी दिल्ली यांचेमार्फत सन २००९ चे डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्काराने सन्मानित.
- भोकर तालुका फळबाग उत्पादन संघाची स्थापना.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००९

## श्री. धनंजय किशनराव भोसले



### मु.पो. मातोळा, ता. औसा, जि. लातूर

- ऊस पिकाची लागवड करुन विक्रमी उत्पादन -- गु-हाळ बांधून लहान अर्धा किलोच्या ढेपी बनविल्या व लंडनच्या बाजारात गुळ निर्यात करुन दुप्पट भाव मिळविला.
- टोमॅटोचे एकरी ५० टन उत्पादन घेतले तसेच २.५ एकर क्षेत्रावर डाळिंब लागवड करुन एकरी २० टन उत्पादन मिळविले.
- माल साठवण्यासाठी ४० x ३५ फुट आकाराचे पॅक हाऊस बांधले.
- शेतक-यांमध्ये जागृती निर्माण करणेसाठी शेतकरी मेळाव्याचे आयोजन करणे.
- सन २००९ चा सिंचन सहयोग पुरस्कार प्राप्त

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००९

## श्री. कमलकिशोर मदनलाल धिरन

### मु.पो. पाळोदी, ता. दारव्हा, जि. यवतमाळ



- एकूण क्षेत्र २४ हे. असून संत्रा, केळी, ऊस लिंबू, कापूस, हरभरा इत्यादी पिकाचे उत्पादन.
- सन १९९१ पासून सर्व पिकांसाठी सेंद्रिय शेतीचा अवलंब
- सर्व पिकाची लागवड मिश्र पध्दतीने करुन विविध पिकांचे बिजोत्पादन.
- सेंद्रिय पध्दतीने कापूस उत्पादन करुन मागील १९ वर्षापासून परदेशात निर्यात .
- गावामध्ये सेंद्रिय धान्य विक्री केंद्र सुरु करुन वसंत कृषि विज्ञान मंडळाची स्थापना.
- विदर्भ ॲग्रो असोशिएशनचे सदस्य
- सन २००३ मध्ये सेंद्रिय शेतीसाठी जिल्हापरिषद, यवतमाळ यांचा मार्गदर्शक शेतकरी पुरस्कार प्राप्त.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००९

## श्री. दिलीप वसंतराव काळमेघ

### मु.पो. जामगांव (बु.), ता. नरखेड, जि. नागपूर



- सन १९८५ मध्ये २० x २० फूट अंतरावर षटकोनी पध्दतीने संत्रा पिकाची लागवड करुन पांरपारिक पध्दतीपेक्षा ३० टक्के जादा झाडांची लागवड.
- सन १९८०-८१ मध्ये ६२ एकर क्षेत्रावर सामूहिक पध्दतीने संकरित ज्वारीचा बिजोत्पादन कार्यक्रम यशस्वीरित्या राबविला.
- संकरित सुर्यफूल बिजोत्पादनासाठी हस्तपरागीकरणाची स्वतःची पध्दती विकसित.
- गावामध्ये ५० शेतक-यांकडे बायोगॅस संयंत्राची उभारणी.
- सन १९८४-८५ मध्ये तालुका पातळीवरील ज्वारी पिक स्पर्धेत प्रथम क्रमांक तर २००३ मध्ये जिल्हा परिषद कृषिनिष्ठ पुरस्कार प्राप्त.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००९

## श्री. माधव शिवराम पवार

### मु.पो. निळवंडे, ता. संगमनेर, जि. अहमदनगर



- नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करीत असल्याने परिसरामध्ये पथदर्शक शेतकरी म्हणून परिचित .
- डाळींब फळपिकाशिवाय कांदा, ज्वारी, गहू, हरभरा या पिकांचे उत्पादन उत्कृष्ठ प्रकारे घेवून सुधारित वाणांचा वापर.
- कृषि विभागामार्फत आयोजित करण्यात येणा-या परिसंवाद, शिवारफेरी व चर्चासत्रात हिरीरीने सहभाग.
- सेंद्रिय शेतीअंतर्गत गांडूळ उत्पादन, हिरवळीचे खताचा वापर, व्हर्मीवॉश, शेण व गोमूत्र स्लरीचा वापर, निंबोळी अर्क व दशपर्णी अर्काचा वापर.
- सामाजिक कार्याची आवड असून परिसरातील शेतक-यांना वेळोवेळी मार्गदर्शन.